Movie: Gho Mala Asla Hava
Year: 2009

Song: Saave Tujh Lagin Tharal
Lyricist:

माका नाय तुका नाय
ह्येका नाय त्येका नाय
उजव्या कानाचो डाव्या कानाक
कुणीच कुणाक सांगुक नाय
सारं गाव बोंबलाया लागलं लागलं
सावे तुझं लगीन ठरलं ठरलं
देवा हो देवा गणपती देवा
सावीच्या लग्नाला वाजत येवा

सये गं मला असं का गं व्हतं हं...
मोती पाण्याचे का झेलूशे गं वाटतं हं...
सये गं मला असं का गं व्हतं
मोती पाण्याचे का झेलूशे गं वाटतं
झुलावसं वाटतं हिला माडांच्या सावलीत
सपनांच्या दुनियेत फिरावसं वाटतं
अगं माझे वच्छे
हिला असं का गं व्हतं

सावी आमची पोर गुणाची
ती शी जराशी कवल्या मनाची
अशी दर्याच्या लाटेच्या वरची
उधाण वेडी अन् नाचरी होडी
हिच्या हो पाठीशी बहिणीची जोडी
सटवाईला ती घालतीया कोडी
पोरींचं लेंडार बाप हो ओढी
त्यानं देवाला साकडं हो घातलं
हो त्याच्या नशिबाचं कोंबडं आरवलं
सावे तुझं लगीन ठरलं
सावे तुझं लगीन ठरलं

ठरलं ठरलं ठरलं
सावे तुझं लगीन ठरलं

सये गं मला असं का गं व्हतं हं...
पाहून पाखरू उडावसं वाटतं हं...
सये गं मला असं का गं व्हतं
पाहून पाखरू उडावसं वाटतं
उडणाऱ्या पाखरासंग डोलावसं वाटतं
पोटात कुठंतरी ग्वाड ग्वाड वाटतं
असं का गं व्हतं हिला
असं का गं व्हतं हं...

भरतीच्या दर्यावर
सुनसान का वाटतं
काळजात गो माझ्या
का अचानकसं दुखतं
सोडून गो जावची तुका
घाई कित्याक दिसता
आमचा गो काळीज तुका
वाटता का सस्ता

आता काय तुका
पावडर लावूक होवी
काजल घालूक डोल्यात
नी चप्पल पायात नवी
आयन्यात तू बघशी
तुझा त्वांड गोरा गोरा
अगो मुंबईची सून तू
काय तुझा तोरा

PlanetRead
Literacy for a Billion

झटापट पटापट घोवाच्या साथीनं
मुंबईचं बंदर तू गाठलं
सावे तुझं लगीन ठरलं
सावे तुझं लगीन
ठरलं ठरलं ठरलं ठरलं
सावे तुझं लगीन ठरलं

देवा हो देवा गणपती देवा
सावीच्या लग्नाला वाजत येवा
कोण म्हणतं काय म्हणता
असं म्हणता कसं म्हणता
कोणीच सावीक सांगुक नाय
पोरीक काईचं ठाऊक नाय

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*